**CNR No.**
MHRG04-002320-2023

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३४९/२०२३

अरूणा वसंत तांबोळी व इतर ...वादी
विरूध्द
यशवंत रावजी तांबोळी व इतर ...प्रतिवादी

## निशाणी क्र.५वरील आदेश.

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश प्रतिवादी क्र.१६, १७ व १९ यांचेविरूध्द मिळणेसाठी सादर केला आहे.

२) अर्ज, दावा व वादीने सादर केलेले कागदपत्र वाचले. प्रतिवादी क्र.१, १६, १७ यांचे म्हणणे निशाणी ७२ वाचले. वादी व प्रतिवादी क्र.१, १६, १७ यांचे विद्वान वकीलांनी सादर केलेले लेखी युक्तिवाद निशाणी ९२ व ९५ वाचले.

३) विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमीमांसा नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीचे हक्कात सकृतदर्शनी बाजू आहे का ? | ...नाही. |
| २ | वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे का ? | ...नाही. |
| ३ | मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | ...नाही. |
| ४ | वादी विनंतीप्रमाणे मनाई आदेश मिळणेस हक्कदार आहे का ? | ...नाही. |
| ५ | आदेश काय ? | ...अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## :: कारणमीमांसा ::

**मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता.** :-

४) विवेचन पुनरावृत्ती टाळणेसाठी मुद्दे क्र.१ ते ४ एकत्रित घेत आहे.

५) वादीने प्रस्तुत दावा १/९ हिस्सा वाटप, दावा मिळकत भूमापन क्र. १११ संपादनापोटी मिळणारी नुकसानभरपाई रक्कमेत हिस्सा वाटप, दिनांक ०५-०३-२००७ रोजीचे प्रतिवादी क्र.१६ व १७ यांचे लाभातील खरेदीखत रद्द करणे व इतर अनुषंगिक आदेशाकरीता सादर केला आहे. वादी व प्रतिवादी क्र.१, १६ व १७ यांचे म्हणणे यावरून वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे नातेसंबंध वादातीत नाहीत. तसेच दावा मिळकतीचे पूर्वीचे मालक व वारसाहक्क वादातीत नाही.

६) वादीचे दावा कथन थोडक्यात असे आहे की, दावा मिळकती रावजी रघुनाथ तांबोळी उर्फ वाणी यांचे मृत्यूनंतर वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांना वारसाहक्काने आली आहे. माहे डिसेंबर २००६ मध्ये सर्व वारसांनी कौटुंबिक अडचणीकरीता भूमापन क्र.४६/३ व भूमापन क्र.४७/२ हया मिळकती विक्री करणेचे ठरविले. सदर व्यवहारास प्रतिवादी क्र.१ ने पुढाकार घेतला. व्यवहार पूर्ण करणेस सर्वांना हजर रहावे लागू नये याकरीता वादी क्र.१ चे लाभात अखत्यारपत्र केले. सदर अखत्यारपत्राच्या आधारे भूमापन क्र.४६/३ व भूमापन क्र.४७/२ हया मिळकती दिनांक ३०-१२-२००६ रोजी भरत आंबेकर यांस विक्री केल्या आहेत. खरेदीखताची मोबदला रक्कम सर्व वारसांनी वाटून घेतली होती.

७) वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, दावा मिळकत भूमापन क्र.१११ व भूमापन क्र.१४/२ हया मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.१ याने सर्व वारसांची दिशाभूल व फसवणुक करून कोणतीही कल्पना न देता दिनांक -१२-२००६

रोजीचे कुलमुखत्यारपत्र स्वत:चे लाभात केले व दिनांक २०-१२-२००६ रोजी ॲडव्होकेट प्रफुल्ल म्हात्रे यांचेकडे नोटराईज्ड केले. सदर कुलमुखत्यारपत्राचा प्रतिवादी क्र.१ ने वापर करून त्याची मुले प्रतिवादी क्र.१६ व १७ यांचे लाभात दिनांक ०५-०३-२००७ रोजी खरेदीखत नोंदवले आहे, याची माहिती वादीस दावा मिळकतीपैकी भूमापन क्र.१११ संपादनाची अधिसूचना समजल्यानंतर वादीने प्रतिवादी क्र.१ यांस संपर्क केला व त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली त्यावेळी माहित झाले.

८) प्रतिवादी क्र.१, १६ व १७ यांनी वादीचे आरोप नाकारले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.१२ ते १५ यांनी दावा मिळकतीबाबत या न्यायालयात रे.मु.क्र.१५१/२०१२ दाखल केला होता. सदर दाव्यात प्रस्तुत वादी पक्षकार होते. प्रस्तुत दावा मुदतीत नाही. सर्व वारसांत बैठक होवून रावजी रघुनाथ तांबोळी यांचे नांवे असलेल्या मिळकतींचे वाटप करण्याचे ठरले. त्याचाच भाग म्हणून दिनांक ३०-१२-२००६ रोजी भूमापन क्र.४६/३ व भूमापन क्र. ४७/२ बाबत वादी क्र.१ च्या लाभात अखत्यारपत्र करण्यात आले. त्याद्वारे वादी क्र.१ ने सदर मिळकत भरत आंबेकर यांस विक्री केली व त्याचा संपूर्ण मोबदला स्वत: घेतला. सर्व वारसांनी भूमापन क्र.१११ व भूमापन क्र.४२/२ हया मिळकतींबाबत प्रतिवादी क्र.१ च्या नांवे हस्तांतरण करण्यासंदर्भात दिनांक २१-१२-२००६ रोजी नोटरीकृत कुलमुखत्यारपत्र केले आहे, याची सर्व वारसांना माहिती आहे. सदर कुलमुखत्यारपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र. १६ व १७ यांचे लाभात दिनांक ०५-०३-२००७ रोजी नोंदणीकृत खरेदीदस्त केला आहे. सन २००७ ते सन २०२३ या काळात कोणत्याही वारसाने हरकत घेतली नाही. दावा मिळकत विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी संपादित करणेत येत आहे. सदर संपादन हे वादी क्र.१ ते ७ यांचे निदर्शनास आल्याने व जमिनीच्या किंमती वाढल्यामुळे वादीने खोटा दावा केला आहे.

९) वादी व प्रतिवादी क्र.१, १६ व १७ यांचे कथनांवरून दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र.१ चे लाभात दिनांक २०-१२-२००६ रोजी नोटराईज्ड केलेले अखत्यारपत्र दस्त कायदेशीर व वैध आहे कां?, सदर दस्त

प्रतिवादी क्र.१ याने बेकायदेशीर व लबाडीने केलेला आहे का?, असा संपरीक्षाधीन वादप्रश्न उपस्थित झालेला आहे. दावा मिळकत तसेच वादी क्र.१ हिने विक्री केलेली मिळकत हया वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांना रावजी रघुनाथ तांबोळी यांचेकडून वारसाहक्काने आलेली मिळकत आहे, याविषयी वाद नाही. वादी क्र.१ चे लाभात केलेले भूमापन क्र.४६/३ व भूमापन क्र.४७/२ हया मिळकतीबाबतचे अखत्यारपत्र व त्याअन्वये भरत आंबेकर यांस विक्री केलेले व्यवहाराची मोबदला रक्कम वादी क्र.१ हिने सर्व वारसांना वाटून दिली हे दर्शविणारा लेखी सकृतदर्शनी पुरावा वादीने सादर केलेला नाही.

१०) प्रस्तुत दाव्यात नमूद केलेले प्रतिवादी क्र.१ चे लाभातील अखत्यारपत्र व प्रतिवादी क्र.१६ व १७ यांचे लाभातील खरेदी दस्त व हिश्याबाबत या दाव्यातील प्रतिवादी क्र. १२ ते १५ यांनी रे.मु.क्र.१५१/२०१२ हा दिवाणी दावा दाखल केला होता. सदर दावा विनाकार्यवाही दिनांक १६-१२-२०१९ रोजी खारीज झाला आहे. सदर दाव्याचा उल्लेख वादीने प्रस्तुत दाव्यात केला नाही. सदर दाव्याची निशाणी १ प्रत आदेशासह प्रतिवादीने सादर केली आहे. रे. मु.क्र.१५१/२०१२ (जुना स्पे.मु.क्र.२५७/२००८) यातील निशाणी १ प्रत दर्शवते की, सदर दाव्यात आताच्या दाव्यातील वादी क्र.१ ते ५ हे प्रतिवादी क्र.१२ ते १६ असे होते. निशाणी १ वरील दिनांक ०४-११-२०१७ व दिनांक १७-०७-२०१३ रोजीच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांचे विरूध्द विनाकैफियत सुनावणी आदेश पारीत झाला आहे. यावरून प्रस्तुत वादी यांना सन २०१३ सालापासून रे. मु.क्र.१५१/२०१२ या दाव्याची माहिती होती. रे.मु.क्र.१५१/२०१२ या दाव्यातील संपूर्ण आरोप हे प्रस्तुत दाव्यात नमूद केलेप्रमाणे वादींचे आरोपाप्रमाणे आहेत. उलटपक्षी सदर दाव्यात वादी व प्रतिवादी यांचे तोंडी वाटप झाल्याचे नमूद केले आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र.१ चे लाभातील अखत्यारपत्र व प्रतिवादी क्र.१६ व १७ यांचे लाभातील खरेदीखत याविषयी आरोप केले आहेत.

११) रे.मु.क्र.१५१/२०१२ यातील निशाणी १ विचारात घेता प्रस्तुत दाव्यातील वादी यांना सन २०१३ सालापासून दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र. १ चे लाभातील अखत्यारपत्र व प्रतिवादी क्र.१६ व १७ यांचे लाभातील

खरेदीदस्त याची माहिती व ज्ञान सन २०१३ सालापासून होते. याउपरही दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ हे सन २०२३ सालापर्यंत एकत्रात वहिवाट करीत होते हे दर्शविणारा सकृतदर्शनी लेखी पुरावा नाही. त्यामुळे वादीचे लाभात सकृतदर्शनी बाजू व न्यायाचा समतोल नाही. पुराव्याअंती दावा मिळकतीत वादींना हिस्सा मंजूर झाल्यास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून प्रतिवादी क्र.१, १६ व १७ यांचेकडून रक्कमेची वसुली करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे वादीचे नुकसान होण्याचे कारण नाही. याप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: **आदेश** ::

अर्ज निशाणी ५ खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

पनवेल,
दिनांक : १५-०६-२०२४.

(कृ. मु. सोनवणे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
पनवेल.